# वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा

पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

फॅक्स क्र. ०२०-२६१३००५४ इ-मेल: vslnapune22@gmail.com


जा.क्र. वपाविय/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०/ ६११ /२०२५ दिनांक - २८ / ०७/२०२५

प्रति,

मा. संचालक,

फलोत्पादन संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत फळबाग लागवडीकरिता अदा केलेल्या रक्कम रुपये ७ कोटी मधून पाणलोट क्षेत्रातील कुटुंबांना कलमे रोपे वाटप करण्याबाबत कार्यवाही.

संदर्भ : दि. २४/७/२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत दिलेली मान्यता .

वरील विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत फळबाग लागवडीसाठी कलमे रोपे उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याला दिनांक. ३० जानेवारी २०२३ रोजी रक्कम रुपये ७ कोटींचा निधी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे. परंतु हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणांकडून अपेक्षित प्रमाणात कलमे रोपांची उचल झालेली नाही. त्यामुळे, उर्वरित निधीचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीने, आपल्या अधिनस्त शासकीय रोपवाटिकांमध्ये उपलब्ध असलेल्या कलमे रोपांपैकी रक्कम रुपये ७ कोटींच्या मर्यादेत जेवढी कलमे रोपे होतील ती पाणलोट क्षेत्रातील कुटुंबांना वाटप करण्याचे निश्चित केले आहे.

राज्यातील १४० पाणलोट प्रकल्पांमध्ये ३९३५०५ कुटुंबे आहेत. जिल्हा निहाय कुटुंबांची संख्या, शासकीय रोप वाटिकांमध्ये उपलब्ध असलेली कलमे रोपे, व रक्कम रु. ७ कोटीमध्ये वाटप करता येणाऱ्या कलमे रोपांची संख्या यांचा सविस्तर तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे. याकरिता आपण जिल्हा निहाय उपलब्ध असलेली कलमे रोपे संबंधित नजीकच्या शासकीय रोपवाटिकांमधून उचल करण्यासाठी जिल्हानिहाय रोपवाटिका निहाय कलमे रोपे उचल करण्याचे आवंटन (Allocation) निश्चित करून संबंधीत रोपवाटिकांना व जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना कळवावे. कलमे रोपे उचल करण्याचे आवंटन (Allocation) निश्चित करून दिले नंतर जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा हे पाणलोट प्रकल्पातील गावामधील प्रति कुटूंब निश्चित करून दिले प्रमाणे कलमे रोपे वाटप करतील. कलमा रोपांची वाहतूक करून नेण्याची कार्यवाही जिल्हा दर सूची (DSR) नुसार प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा करतील कलमा

रोपांची वाहतुकीचा खर्च आपल्याकडे वर्ग केलेल्या निधीमधून करण्यात येणार आहे. कलमे रोपे वाहतुकीच्या खर्चा करिता अंदाजित रक्कम रु. २ लाख प्रति जिल्हा प्रमाणे (आवश्यकते नुसार बदल होईल) रक्कम रु. ६० लाख कार्यालयाने कळविले जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे बँक खात्यावर वर्ग करावेत. वाहतूक रक्कम वगळून राहिलेल्या रकमेत वाटप करता येईल अशा कलमा रोपांची जिल्हा निहाय संख्या निश्चित करून सोबत जोडलेली आहे. यापूर्वी उचल केलेली कलमे रोपे वगळून उर्वरित कलमा रोपांचे उचल करण्याकरिता रोपघाटिका आवंटन निश्चित करून द्यावे

सदर कलमे रोपे वाटपासाठी रोप वाटिकांमध्ये उपलब्ध असलेल्या शासकीय दरानेच कलमे रोपे वितरित करावीत. याआधी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणांनी उचल केलेल्या कलमे रोपांची संख्या वजा करून उर्वरित कलमे रोपे वितरित करावीत. जिल्हा निहाय उपलब्ध असलेल्या रोपांची माहिती व उचल करण्याचे नियोजन प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व जिल्हा जलसंधारण अधिकारा व रोपवाटिका अधिकारी यांना कळवावे. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व जिल्हा जलसंधारण अधिकारी व रोपवाटिका अधिकारी यांचे समन्वयासाठी राज्य स्तरावर एका अधिका-यांची नियुक्ती करून त्यांचे नाव संपर्क क्रमांक सर्व संबंधीतांना कळवावा. कलमे रोपे स्थानिक किंवा नजिकच्या शासकीय रोपवाटिकांमधून उपलब्ध करून द्यावीत. २०२५-२६ वर्ष हे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० हे अंतिम वर्ष असल्याने २०२५-२६ हंगामातच प्रस्तुत कलमे रोपे प्राधान्याने उपलब्ध करून द्यावीत.

28.7.25

कमलाकर रणदिवे
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पहिला मजला, पुणे-४११००१.

## जिल्हानिहाय वाटप करावयाच्या कलमा रोपांचा तपशील

| अ.क्र. | जिल्हा | कुटुंब संख्या | आंबा | काजू | पेरू | चिकू | नारळ | जांभूळ | फणस | कागदी लिंबू | सुपारी | एकूण वाटप करावयाची कलमे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ५११७५ | ५११७५ | ५११७५ | | १६३४८ | २४३७ | | ५४८ | | | १२१६८३ |
| २ | ठाणे | १४२५ | १४२५ | १४२५ | | ५०० | १४१५ | | १७७ | | | ४९४२ |
| ३ | रायगड | ४१००६ | ४१००६ | २९५८८ | | २४१० | ४१००६ | | ५३८ | | २९२२३ | १४३७७१ |
| ४ | रत्नागिरी | २६०७५ | २६०७५ | २६०७५ | | २७४८ | २६०७५ | | १७५ | | २६०७५ | १०७२२३ |
| ५ | सिंधुदुर्ग | १३३५२ | १३३५२ | १३३५२ | | १८५ | १३३५२ | | | | २६९८ | ४२९३९ |
| ६ | नाशिक | ५२५४ | ५२५४ | | ५२५४ | ३८४९ | | | | ३०८३ | | १७४४० |
| ७ | नंदुरबार | १५६७८ | १५६७८ | | २५१२ | ३६५१ | | | | ३७७५ | | २५६१६ |
| ८ | जळगाव | ७६२७ | ७६२७ | | ७६२७ | ४४१४ | | | | ७६२७ | | २७२९५ |
| ९ | अहमदनगर | ११४३७ | ११४३७ | | ११४३७ | ३९०६ | | | | ८३१३ | | ३५०९३ |
| १० | पुणे | २९११ | २९११ | | २९११ | | | २९११ | | २९११ | | ११६४४ |
| ११ | सोलापूर | १११२० | १११२० | | १४२ | | | | | १११२० | | २२३८२ |
| १२ | सांगली | ११७१३ | ११७१३ | | १९१ | | | ११२६० | | १५२ | | २३३१६ |
| १३ | छ.संभाजीनगर | १९१५१ | १९१५१ | | ३८०० | १११३ | | १८८२ | | १७३१ | | २७६७७ |
| १४ | जालना | ४६६१ | ४६६१ | | २०५८ | ७८७ | | ६५ | | ४६६१ | | १२२३२ |
| १५ | बीड | ५२६२ | ५२६२ | | ५२६२ | ५२६२ | | १५०० | | ५२६२ | | २२५४८ |
| १६ | लातूर | ७६३८ | ७६३८ | | ५४७३ | १००२ | | | | २५१९ | | १६६३२ |
| १७ | धाराशिव | १४५५६ | १४५५६ | | | २५ | | ५९ | | ११२८ | | १५७६८ |
| १८ | नांदेड | १०२८४ | ६१२२ | | २६०९ | १६८४ | | २६७२ | | १०२८४ | | २३३७१ |
| १९ | परभणी | ८६११ | ३३४७ | | १६२५ | २१५ | | १४०० | | ६७११ | | १३२९८ |
| २० | हिंगोली | १०६२१ | ४१० | | | २५० | | १७५ | | २१६० | | २९९५ |
| २१ | बुलढाणा | १३०८७ | ४११४ | | ११२२६ | | | | ८० | १३०८७ | | २८५०७ |
| २२ | अकोला | १२७५९ | | | ६०० | | | | | १२७५९ | | १३३५९ |
| २३ | वाशिम | १६९९२ | ४५९९ | | २०७० | | | | ५०० | ३६४८ | | १०८१७ |
| २४ | अमरावती | ५९४३ | ५९४३ | | ५४५१ | | | | २०८९ | ५९४३ | | १९४२६ |
| २५ | यवतमाळ | ४४४३ | ४४४३ | | ४२० | | | | २६७४ | ४४४३ | | ११९८० |
| २६ | वर्धा | ५३९७ | ८६३ | | १८३२ | | | | २३ | ५३९७ | | ८११५ |
| २७ | भंडारा | ८०१८ | ५१८४ | | २०८९ | ११४० | | | १२३१ | १६६८ | | ११३१२ |
| २८ | गोंदिया | १७५८६ | १३०५० | | १२०० | ७० | | | ५५० | १२९६ | | १६१६६ |
| २९ | चंद्रपूर | २२९८७ | ४३०९ | | २५६६ | १७४९ | | | ८४७ | ७०९६ | | १६५६७ |
| ३० | गडचिरोली | ६७०४ | ६७०४ | | ८९ | २४१५ | | | ५७८३ | ५५१० | | २०५०१ |
| एकूण | | ३९३४७३ | ३०९१२९ | १२१६१५ | ७८४४४ | ५३७२३ | ८४२८५ | २११२४ | १५२१५ | १३२२८४ | ५७९९६ | ८७४६१५ |

अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे